# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ०२२-२२६११०१५

**MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION**

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai-400 001
Website:www.msbnpe.orgE-mail- msbnpe@gmail.com, Mobile No- ०२२-२२६११०१५


---

क्र.मराशुवपशिमं/ मंडळसदस्य /१२९६५/२०२४ दिनांक :-२९/११/२०२४

## परिपत्रक

महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ अधिनियम,२०१३ क्रमांक एमएनसी-०८१८ /प्र.क्र.२२८/अधिनियम-महाराष्ट्र शासन व्दारे महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ अधिनियम (२०१३ चा महा.२३) यांच्या कलम ५(१) च्या व्दारे महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. शासनाचे पत्र क्रमांक MEED-१४०१०(२)/१/२०२४-MMD(ADHI), दिनांक २३ सप्टेंबर २०२४ नुसार नामनिर्देशित सदस्यांची कालावधी संपुष्टात आल्याने नवीन नामनिर्देशित सदस्यांची अधिनियमाच्या कलम ५(१) (ड) मधील (क) (ख) (ग) (घ) याव्दारे नियुक्ती करण्याकरीता पात्र सदस्यांच्या नावाची शिफारस शासनास करण्यांबाबतचे पत्र मंडळास प्राप्त झाले आहे.

**त्यानुसार उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (१) (ड) अन्वये पुढील सदस्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येतील.**

(क) राज्यातील शासकीय शुश्रुषा महाविद्यालयांमधून एक प्राचार्य.

(ख) संस्थाचे प्राचार्य आणि प्रमुख यांच्यामधून दोन सदस्य,यांपैकी एक सदस्य हा शासकीय संस्थेतील असेल आणि दुसरा सदस्य हा महानगरपालिकेच्या संस्थेतील असेल आणि यांपैकी किमान एक सदस्य ही महिला असेल.

(ग) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय आणि आरोग्य सेवा संचालनालय यांच्या अंतर्गत असणारे शासकीय पदविका महाविद्यालय किंवा विद्यालय यांच्या अध्यापकांमधून असेल.

(घ) प्रत्येक प्रदेशाचा एक प्रतिनिधी ज्याने शुश्रुषा किवा परावैद्यक शिक्षणामधील पदव्युत्तर पदवी ही किमान अर्हता धारण केली असेल आणि त्याला अशा क्षेत्रामधील किमान पाच वर्षाचा अनुभव असेल.

**उपरोक्त बाबीची पुर्तता करुन त्यानुसार प्रस्ताव मंडळाच्या कार्यालयास सदर परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द केल्यापासून सात दिवसांत (दिनांक २९/११/२०२४ ते दिनांक ०९/१२/२०२४) कार्यालयीन वेळेत ईमेल व्दारे, स्पीट पोस्ट, हस्तबटवडा व्दारे, सादर करण्यांत यावे. तसेच विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.**

**संचालक,**
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ